फ्लॅट विकणे आहे
रुक्मिणी नगर येथील
सर्व सोईयुक्त व संपूर्ण इंटेरियर फर्निचर केलेला
2 BHK
(पेन्ट हाऊस) फ्लॅट
त्वरित विकणे आहे.
संपर्क : 8329453100

हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

७७ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७७ वे/अंक ७८ वा ■ ■ अमरावती,बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १३ कार्तिक १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.००

सरकार संसदेत 'एसआयआर'सह प्रत्येक मुद्यावर चर्चेस तयार

अमित शाह यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

नवी दिल्ली दि. ३ : केंद्र सरकार संसदेत मतदार यादीच्या पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेसह प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. एवढेच नाही, तर त्यांनी यावेळी राहुल गांधींना चर्चेसाठी आव्हान देत थेट निशाणा साधला. ते छत्तीसगडमधील नवा रायपूर येथील अटल नगर येथे विकसित भारत संकल्प पार्क पीपल वनच्या लोकार्पण सोहळ्यावेळी बोलत होते.



राहुल गांधींवर असंवैधानिक सरकारांच्या समर्थनाचा आरोप

राहुल गांधी यांच्यावर हल्ला चढवताना अमित शाह म्हणाले, राहुल गांधी यांनी 'जनता सरकार'चे (माओवादी 'जनता सरकार' संकल्पना) आणि असंवैधानिक सरकारांना पाठिंबा दिला आहे. काँग्रेस पक्षाने नेहमीच असंवैधानिक सरकारांचे आणि माओवाद्यांच्या 'जनता सरकार' संकल्पनेचे समर्थन केले आहे. जेथे जनतेने कुठलेही सरकारं निवडली नव्हती, तेथे नक्षलवाद्यांचे वेगळेच गृहमंत्री, मुख्यमंत्री आणि वित्तमंत्री असायचे. अनेक निर्दोष पत्रकार, समाजसेवक आणि विद्यार्थ्यांना झाडांना लटकावून मारले गेले आणि राहुल गांधी संसदेतही याचे गोष्टींचे समर्थन करतात.

छत्तीसगडच्या विकासासंदर्भात बोलताना गृहमंत्री अमित शाह म्हणाले, अटलबिहारी वाजपेयी यांनी छत्तीसगड राज्य निर्माण केले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते राज्य *(उर्वरित पान २ वर)*

देशद्रोही कोण ते समोरासमोर चर्चा करु राहुल गांधीचे मोदींना पुन्हा चर्चेचे खुले आव्हान

नवी दिल्ली दि. ३ : गेल्या अनेक दिवसांपासून देशातलं राजकारण एसआयआरमधील कथित घोळ आणि इतर युवकांच्या प्रश्नांभोवती फिरत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याची मागणी, त्यासाठी विरोधकांचं दिल्लीतलं मोठं आंदोलन आणि त्यातच आता भर पडली आहे, ती राहुल गांधी विरुद्ध पीएम मोदी यांच्या राजकीय लढाईची. राहुल गांधी यांचं पीएम नरेंद्र मोदी यांना समोरासमोर चर्चेचं आव्हान आलं आहे. देशद्रोही कोण, परदेशी शक्तींशी कोणाचे संबंध? यावर चर्चा करु, असं राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे. या ट्विटमधून त्यांनी आपण समोरासमोर चर्चा करु, असं आव्हान राहुल गांधींनी मोदींना दिलं आहे.



राहुल गांधींनी नेमकं काय म्हटलंय?

मोदीजी, तुम्हाला मी आव्हान देऊन २४ तास उलटले आहेत. तुम्ही विरोधकांना देशविरोधी ठरवता. मग चला, कोणत्याही व्यासपीठावर, कोणत्याही ठिकाणी माझ्याशी जाहीर चर्चा करा. देशविरोधी कोण आहे? परकीय शक्तींशी कोणाचे संबंध आहेत? आणि हे संबंध नेमके कशा स्वरूपाचे आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरे खुल्या चर्चेतून समोर येऊ द्या. लवकरात लवकर ही चर्चा घडवून आणा. घाबरू नका.

या चर्चेला आपण दोघेही उपस्थित राहू. माध्यमांचे प्रतिनिधी असतील, देशातील तरुणाईही असेल. समोर एक टेबल असेल. तुम्ही एका बाजूला बसा आणि मी दुसऱ्या बाजूला बसतो. या चर्चेसाठी तुम्हाला हवा तो परीक्षक नेमा. अगदी मोहन भागवतजींनाही परीक्षक म्हणून बसवायला माझी हरकत नाही.

या चर्चेत देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर, आर्थिक धोरणांवर प्रश्न उपस्थित होतील. अमेरिकेसोबतचा करार नेमका कसा झाला, तो करण्याची घाई का करण्यात आली, इतक्या कमी वेळेत हा निर्णय का घेतला? हा निर्णय तुम्ही एकट्यानेच का घेतला? मंत्रिमंडळाला त्याची माहिती का देण्यात आली नाही? अदानी प्रकरण का बंद करण्यात आले? एपस्टीन प्रकरणासह अशा अनेक मुद्द्यांवर आपण सविस्तर आणि खुली चर्चा करू.

इतर प्रकरणांमध्ये तुम्ही माझ्याविरोधात मानहानीचे खटले दाखल केले आहेत. माझ्या मते, असे सुमारे ४५ खटले माझ्यावर दाखल आहेत. मात्र, परकीय शक्तींशी संबंध असल्याच्या आरोपांवर चर्चा करण्याचे मी आव्हान दिल्यानंतर तुम्ही मानहानीचा खटला दाखल केलेला नाही. मग या मुद्द्यावरही खटला दाखल करा. त्यावरही आपण जाहीरपणे चर्चा करू.

मोदीजी, दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

पुन्हा एकदा सांगतो, *(पान २ वर)*

सत्तेत आहात, मोर्चे कसले काढताय? राज ठाकरे यांचा भाजपवर हल्लाबोल

मुंबई दि. ३ : फक्त सत्ता येऊन चालत नाही. सत्ता अंगात असावी लागते. भाजप अजून विरोधी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर पडला नाही. तर काँग्रेसला विरोधी पक्ष कसा असतो हे आता आता कळायला लागलंय, असं सांगतानाच तुम्ही सत्तेत आहात. लोकशाही वाचवा म्हणून मोर्चा काढत आहात. तुम्ही सत्तेत आहात ना? मोर्चे कसले काढताय? कशासाठी काढत आहात? असा संतप्त सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. काल केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी तेलंगणात 'लोकशाही वाचवा' रॅलीचं आयोजन केलं होतं. त्यावर राज ठाकरे यांनी टीका केली.



कार्टुनिस्ट अलोक यांनी पुलं देशपांडे यांच्यावर दिनदर्शिका तयार केली आहे. त्याचं उद्घाटन राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी विधान परिषदेच्या निवडणुकीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली. विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या. आधी आलेला निवडणुकीचा अंदाज चुकला. त्यापूर्वीच काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही, असं ट्विट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होतं. ही विधान परिषदेची निवडणूक आहे. ती काही ठिकाणी झाली. त्यावर पंतप्रधान ट्विट करतात? मी आजवर कोणत्याच पंतप्रधानांनी असं ट्विट केलेलं पाहिलं नाही. कारण भाजप अजूनही विरोधी पक्ष नेत्याच्या भूमिकेतून बाहेरच आलेला नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

भलत्याच दरवाज्यावर बेल वाजवली

यावेळीत्यांनी पुलं देशपांडे यांचा किस्साही ऐकवला. पुलंना बघण्याचा अनुभव अनेकदा आला. पण भेटण्याचा एकदाच *(उर्वरित पान २ वर)*

एसटी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

मुंबई दि. ३ : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी (३ नोव्हेंबर) झालेली बैठक निष्फळ ठरली. निधीअभावी कर्मचाऱ्यांची प्रलंबित देणी देण्यात अडचणी येत असल्याचे सांगत एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी असमर्थता व्यक्त केली. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांवर अद्याप तोडगा निघालेला नाही. महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी ही माहिती दिली.



१,३३८ कोटींची वेतन तूट कर्मचाऱ्यांचा सवाल

गेल्या बारा महिन्यांपासून वेतनासाठीच १,३३८.१५ कोटींची तूट असताना पीएफ, ग्रॅच्युइटी, दिवाळी भेट आणि महागाई भत्त्यासारखे लाभ कसे मिळणार? *(उर्वरित पान २ वर)*

जम्मू काश्मीरमध्ये सरकार कोसळणार?

जम्मू दि. ३ : देशाच्या राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. समोर आलेल्या माहितीनुसार सध्या जम्मू आणि काश्मीरच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. येथे सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स पार्टीच्या आमदारांचा एक गट नाराज आहे. आमदारांच्या नाराजीनंतर आता या पार्टीतील अंतर्गत असंतोष समोर आल्याचं बोललं जातंय. सूत्रांच्या माहितीनुसार साधारण १८ ते २५ आमदार नाराज असल्याचं सांगितलं जातंय.

जम्मू काश्मीरमधील सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. येथे आमदार नाराज नाराज असल्याचे बोलले जातेय. सत्ताधारी पक्षाने नुकतेच आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला. *(उर्वरित पान २ वर)*

मुरासू चक्रीवादळाचे केंद्र आंध्र प्रदेशातून तेलंगणात सरकले



विजयवाडा दि. ३ : आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकलेले मुरासू चक्रीवादळ तेलंगणाच्या दिशेने सरकले आहे. दिलासादायक बाब म्हणजे त्याची तीव्रता ताशी १०० किमीवरून ताशी ६० किमीपर्यंत कमी झाली आहे. चक्रीवादळाचा एक भाग अजूनही आंध्रच्या किनारपट्टीवरून जात असून, त्यामुळे विजयवाडासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने मंगळवार संध्याकाळपर्यंत सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मंगळवारी रात्री सुमारे १ वाजता मुरासू चक्रीवादळाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडक दिली, त्यावेळी वाऱ्याचा वेग ताशी १२० किमीपर्यंत पोहोचला होता. हजारो झाडे उन्मळून पडली आणि शेकडो विजेच्या खांबांचे नुकसान झाले. अनेक बोटींचेही नुकसान झाले.


मुसळधार *(पान २ वर)*

दिल्लीत राष्ट्रवादीचे नेते अन् अमित शाहांमध्ये खलबतं गृहमंत्र्यांकडून महत्त्वाचे निर्देश, विलिनीकरणाबाबतही मोठे आश्वासन

मुंबई दि. ३ : अजित पवार गटाचे नेते खासदार पार्थ पवार यांच्या कार्यशैलीने नाराज असलेल्या पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी काल (सोमवारी, ता २) नवी दिल्लीत भाजपचे नेते आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याशिवाय झालेल्या या अनपेक्षित भेटीने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. या भेटीमुळे पक्ष फुटीच्या उंबरठ्यावर असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ यांच्यासह प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, माजी खासदार समीर भुजबळ यांनी काल (सोमवारी, ता २) शाह यांची भेट घेतली. या भेटीचे फोटो समोर आल्यानंतर चर्चांना उधाण आलं. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंघ ठेवण्याच्या गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना सूचना केल्याची माहिती आहे. विलिनीकरणाचा किंवा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला एनडीए सोबत घेण्याची वेळ आली तर तुमच्याशी चर्चा केल्याशिवाय आणि विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय होणार नाही, असं आश्वासन अमित शाह यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना दिल्याची माहिती समोर आली आहे.

एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत संघर्ष समोर येत असताना दुसरीकडे नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा वाढता प्रभाव याबाबत देखील बैठकीत चर्चा झाली. पार्थ पवार यांचा पक्षात वरिष्ठांना डावलत होतं असलेला हस्तक्षेप आणि मनमानी कारभार याबाबत बैठकीतील नेत्यांनी

अनिल अंबानींवर ईडीची मोठी कारवाई ५१० कोटींची मालमत्ता जप्त



मुंबई दि. ३ : अनिल अंबानी समूहाला ईडीचा आणखी एक मोठा झटका बसला आहे. अनिल अंबानी समूहाच्या विविध कंपन्यांशी संबंधित प्रकरणात ईडीकडून आणखी ५१० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. रिलायन्स कम्युनिकेशन बँक फसवणूक प्रकरणात २४७.१२ कोटी, तर रिलायन्स होम फायनान्स आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स प्रकरणात २६३.०५ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

आरसीओएम प्रकरणात दोन चार्टर्ड विमाने, जमिनीचे सहा भूखंड आणि महाराष्ट्रातील एका कार्यालयीन जागेचा समावेश आहे. *(उर्वरित पान २ वर)*

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला नवी गती मिळणार : मोदी

पुणे दि. ३ : पुणे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे नवी गती मिळणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगरदरम्यान मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे पुण्यातील मोठ्या आयटी क्षेत्राला अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. तसेच शहरातील जुन्या आणि नव्या भागांमधील संपर्क अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. 'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'च्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, केंद्रीय मंत्री मनोहर लाल (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी चिंचवड महापौर रवी लांडगे, खासदार श्रीरंग बारणे उपस्थित होते.

पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा, स्टार्टअप, नवोपक्रम आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असून, मेट्रोच्या वाढत्या सुविधांमुळे शहराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे नमूद करून प्रधानमंत्री म्हणाले, देशात २०१४ मध्ये केवळ २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यरत होते. आज हे जाळे सुमारे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज एक कोटीहून अधिक प्रवासी मेट्रोने प्रवास करीत आहेत. भारतीय मेट्रो नेटवर्क जगातील पहिल्या तीन मोठ्या मेट्रो नेटवर्कमध्ये गणले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.महाराष्ट्रात २०१४ मध्ये केवळ १० ते ११ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू होता. आज सुमारे २०० किलोमीटर मेट्रो मार्ग सेवेत असून, ६८० किलोमीटरहून अधिक मार्गांची कामे सुरू आहेत. राज्यात मेट्रो पायाभूत सुविधांवर अडीच लाख कोटी *(पान २ वर)*

एकाच ठिकाणी अनिश्चित काळासाठी आंदोलने करता येणार नाहीत, सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि. ३ : सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एकाच ठिकाणी अनिश्चित काळासाठी धरणे आंदोलन करता येणार नाही. आंदोलन हे केवळ एका व्यक्तीसाठी नसून सर्वांसाठी आहे; रोजगार आणि व्यवसायाचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, कोणतीही संघटना निदर्शनांसाठी सार्वजनिक जागेवर अनिश्चित काळासाठी कब्जा करू शकत नाही. आंदोलनासाठी निश्चित केलेल्या जागांनाही एक निश्चित कालावधीची मर्यादा असावी, जेणेकरून इतर संघटनांनाही *(उर्वरित पान २ वर)*

माहोल....

म्हणजे आपण 'पार्टी चेंज' करतो, त्यालाच मोठे लोक 'रेझिम चेंज' म्हणतात तर! चालतंय मग, उद्या सकाळी कोणत्या झेंड्याला नमस्कार करायचा तेवढं व्हाट्सपवर टाकून ठेव!